*५०% महागाई भत्याचे/महागाई वाढीचे सेवानिवृत्ति लाभांच्या प्रयोजनासाठी विलीनीकरण.*
*स्पष्टीकरणे ............*

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक : सेनिवे १००६/७२/सेवा ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर २००६

# परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे १००४/१८५/सेवा ४, दिनांक २० जुलै २००४ अन्वये १ ऑगस्ट २००४ पासून मूळ वेतनीच्या/मूळ निवृत्तीवेतनाच्या ५०% एवढा महागाई भत्ता/महागाई वाढ मूळ वेतनात/विद्यमान निवृत्तिवेतनात विलीन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. या आदेशांची अंमलबजावणी करतांना काही मुद्दे खुलासा करण्यासाठी उपस्थित करण्यात आले होते. शासन आता खालीलप्रमाणे मुद्दयांचे स्पष्टीकरण करीत आहे. :-

| अनु. क्र. | मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| १ | (अ) सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान यांची परिगणना करताना<br>(ब) निवृत्तिवेतनाच्या अशंराशीकरणाच्या प्रयोजनार्थ व<br>(क) कुटूंबनिवृत्तिवेतनाच्या प्रयोजनार्थ<br>यथास्थिती, महागाई वेतन (मूळ वेतनाच्या ५०%) किंवा महागाई निवृत्तीवेतन /कुटूंबनिवृत्तीवेतन (निवृत्तीवेतनाच्या / कुटूंबनिवृत्तीवेतनाच्या ५०%) विचारात घेण्यात यावे का ? | (अ) जे कर्मचारी १ ऑगस्ट २००४ नंतर सेवानिवृत्त झालेले आहेत/होतील, केवळ अशा कर्मचाऱ्यांच्याबाबतीत मूळ वेतनात महागाई वेतन (म्हणजे मूळ वेतनाच्या ५०% इतकी रक्कम) विलीन करुन सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान यांची परिगणना करण्यात यावी.<br>(ब) जे कर्मचारी १ ऑगस्ट २००४ नंतर सेवानिवृत्त झालेले आहेत/होतील, केवळ अशा कर्मचाऱ्यांना सुधारीत निवृत्तिवेतनाचे म्हणजे "मूळ वेतन अधिक महागाई वेतन" (मूळ वेतनाच्या ५०%) विचारात घेऊन परिगणित करण्यात आलेल्या निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण करता येईल.<br>(क) दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटूंबातील पात्र व्यक्ती जर १ ऑगस्ट २००४ रोजी कुटूंब निवृत्तिवेतनधारक असेल तर अशा प्रकरणी विद्यमान कुटूंबनिवृत्तिवेतनाच्या ५०% एवढया महागाई वाढीचे विलीनीकरण कुटूंबनिवृत्तिवेतनात करण्यात यावे.<br>१ ऑगस्ट २००४ नंतर सेवेत असताना /सेवानिवृत्त होऊन, निधन झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत त्याने अर्जित केलेल्या शेवटच्या मूळ वेतनात महागाई वेतन(मूळ वेतनाच्या ५०%) विलीन करुन कुटूंबनिवृत्तिवेतनाची परिगणना करण्यात यावी. |
| २ | निवृत्तीवेतनाची किमान मर्यादा रु.१२७५/- वरुन रु.१९१३/- इतकी वाढविण्यात आलेली आहे का ? | जे कर्मचारी ३१ जुलै २००४ पर्यंत सेवानिवृत्त झालेले आहेत, अशांच्या बाबतीत मूळ निवृत्तीवेतनाची किमान मर्यादा पूर्वीप्रमाणेच रु.१२७५/- इतकी राहील. अशा प्रकरणी विद्यमान निवृत्तिवेतनाच्या ५०% इतकी महागाई वाढ निवृत्तिवेतनात विलीन करुन ती "महागाई निवृत्तिवेतन" अशी स्वतंत्रपणे दर्शविण्यात येईल. तथापि, जे कर्मचारी १ ऑगस्ट,२००४ नंतर सेवानिवृत्त झालेले आहेत/होतील अशाच्या प्रकरणी १ ऑगस्ट २००४ पासून ५०% महागाई भत्याचे रुपांतर महागाई वेतनात झाल्याच्या परिणामी त्यांचे मूळ निवृत्तिवेतन/कुटूंब निवृत्तिवेतन रुपये १९१३/- पेक्षा कमी नसेल. |

रोटा/एच-1544(10,000+40-9-2006)-1

| | | |
|---|---|---|
| ३ | जे निवृत्तिवेतनधारक १ ऑगस्ट २००४ रोजी पुनर्नियुक्तीवर आहेत अशाना महागाई निवृत्तिवेतन (मूळ निवृत्तीवेतनाच्या ५० टक्के एवढया महागाई वाढीच्या विलिनिकरणाचा लाभ) अनुज्ञेय ठरेल का? | **नाही.** पुनर्नियुक्त निवृत्तिवेतनधारकांना पुनर्नियुक्तीच्या कालावधीत, त्यांच्या निवृत्तीवेतनावरील महागाई वाढ अनुज्ञेय ठरत नसल्यामुळे जे निवृत्तिवेतनधारक १ ऑगस्ट २००४ रोजी पुनर्नियुक्तीवर आहेत. अशांना मूळ निवृत्तीवेतनाच्या ५०% एवढया महागाई वाढीच्या विलिनीकरणाचा लाभ म्हणजेच महागाई निवृत्तीवेतन, पुनर्नियुक्तीच्या कालावधीत अनुज्ञेय ठरणार नाही. |
| ४ | i) ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था/स्थानिक संस्था इत्यादींमधील त्यांच्या समावेशनाच्यावेळी मासिक निवृत्तिवेतन घेण्याबाबतचा विकल्प दिलेला होता व त्यानुसार जे १ ऑगस्ट २००४ रोजी मासिक निवृत्तिवेतन घेत आहेत आणि<br>ii) ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी सरकारी क्षेत्रातील उपक्रम/स्वायत्त संस्था/स्थानिक संस्था इत्यादींमधील त्यांच्या समावेशनानंतर निवृत्तिवेतना ऐवजीची ठोक रक्कम स्वीकारलेली आहे, व जे निवृत्तिवेतनाच्या १/३ इतका अंशराशीकृत भाग पुनःस्थापित करण्यास पात्र ठरले आहेत व त्यानुसार जे १ ऑगस्ट २००४ रोजी मासिक निवृत्तिवेतन घेत आहेत.<br>अशांना महागाई निवृत्तिवेतन (मूळ निवृत्तीवेतनाच्या ५० टक्के एवढया महागाई वाढीच्या विलिनिकरणाचा लाभ) अनुज्ञेय ठरेल का ? | **होय.** |

३. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००६०९२७१७३२०३००१ असा आहे.

४. या शासन परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( उषा प्र. महाजन )**
**शासनाच्या उपसचिव.**

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
मंत्रालयांच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, (५०० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---
*पत्राद्वारे.

**Merger of 50% Dearness Allowance/Dearness <u>Relief for purpose of retirement benefits</u>. Clarifications ..........**

# Government of Maharashtra

## Finance Department

Circular No. PEN-1006/ 72 /SER -4,
Mantralaya, Mumbai- 400032, dated 20th September 2006.

## CIRCULAR

By Government Resolution, Finance Department, No PEN-1004/185/SER-4, dated 20th July 2004, orders regarding merger of Dearness Allowance/Dearness Relief equal to 50% of the basic pay/exisiting pension with the effect from 1st August 2004, have been issued.

2. While implementing these orders certain points have been raised for clarifications Government is now pleased to clarify as under :-

| Sr. No. | Points | Clarification |
|---|---|---|
| 1 | Whether the Dearness Pay (50% of basic pay) or Dearness Pension/Family Pension (50% of Pension/Family Pension) as the case may be, is to be taken into account -<br>a) while calculating Retirement Gratuity/Death Gratuity<br>b) for the purpose of commutation of pension and<br>c) for the purpose of family pension ? | a) Retirement Gratuity/Death Gratuity should be calculated after taking into account the Dearness Pay (i.e. 50% of basic pay) only in the cases of those employees who retired/will retire after 1st August 2004.<br>b) Only those employees who retired /will retire after 1st August 2004 are entitle for commutation of revised pension i.e. pension calculated after taking into account, "the basic pay plus dearness pay".(50% of the basic pay)<br>c) In such cases where eligible family member of late Government servant is family pensionholder as on 1st August 2004, Dearness Relief equal to 50% of the present family pension should be merged with the family pension.<br>In such cases where the Government servants who died while in service or on retirement, after 1st August 2004, family pension should be calculated after merger of dearness allowance equal to 50% of the last basic pay drawn by him. |

| | | |
|---|---|---|
| 2 | Whether minimum pension of Rs. 1275/- has been enhanced to Rs.1913/- ? | **Minimum basic pension continues to be Rs.1275/- in respect of those employees, who retired upto 31st July 2004. In such cases Dearness Relief equal to 50% of present pension will be merged with pension and shown distinctively as Dearness Pension.** However, on conversion of 50% Dearness Allowance into Dearness Pay from 1st August 2004 the basic pension/family pension in case of those employees, who retired/will retire after 1st August 2004, should not be less than Rs.1913/- |
| 3 | Whether of the pensioners who are on re-employment on 1st August 2004 are eligible for Dearness Pension (i.e for the benefit of merger of Dearness Relief equal to 50% of the basic pension) ? | **No.** Since the re-employed pensioners are not eligible for Dearness Relief on their pension during the period of re-employment, the pensioners who are on re-employment on 1st August 2004 are not eligible for the benefit of merger of Dearness relief equal to 50% of the basic pension. |
| 4 | Whether ---- i) the State Government employees who at the time of their absorption in PSUs /Autonomous bodies/ Local bodies had opted for receiving the monthly pension and therefore, are in receipt of monthly pension as on 1st August 2004 and<br>ii) The State Government employees who had drawn lump sum amount in lieu of pension on absorption in PSUs /Autonomous bodies/Local bodies and have become entitled to restoration of 1/3 commuted portion of pension and therefore, are in receipt of monthly pension as on 1st August 2004 -<br>are eligible for Dearness Pension (i.e for the benefit of merger of Dearness Relief equal to 50% of the basic pension) with effect from 1st August 2004 ? | **Yes.** |

3. This Government Circular is available on the web site of Government of Maharashtra i.e.-"**www.maharashtra.gov.in**" and its computer code number is 20060927173203001.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Usha P. Mahajan)
**Deputy Secretary to Government.**

-------

एच-1544 -33.